मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फ़त अंमलबजावणी करण्यात येणा-या नळ पाणी पुरवठा योजनांच्या पाणी आरक्षणाबाबत.

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांकः मुपेयो-२०१७/प्र.क्र.९१/पापु-१९

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, ७ वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक: १६ सप्टेंबर, २०१७

वाचा

१) शासन निर्णय क्रमांक: ग्रापाधो-१११५/प्र.क्र.९२/पापु-०७, दिनांक ०७ मे, २०१६
२) शासन निर्णय क्रमांक: ग्रापापु-२११५/प्र.क्र.३९/पापु-१९, दिनांक २३ सप्टेंबर, २०१६
३) शासन निर्णय क्रमांक: मुपेयो-२०१७/प्र.क्र.८३/पापु-१९, दिनांक २५ जानेवारी, २०१७

प्रस्तावना:-

राज्यातील ग्रामीण भागातील पाणीपुरवठा क्षेत्रात सुधारणा करण्याच्या उद्देशाने व ग्रामीण जनतेस शुध्द व पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याकरिता संदर्भाधीन क्र.१ येथील दि.०७ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०१६-१७ ते २०१९-२० या चार वर्षाच्या कालावधीत राज्यात मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणा-या नळ पाणीपुरवठा योजनांच्या अंमलबजावणीस होणारा विलंब टाळण्याकरिता, मंत्रिमंडळाच्या दिनांक १६ मे, २०१७ रोजी झालेल्या बैठकीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत समाविष्ट पाणीपुरवठा योजनांसाठी जलसंपदा विभागाच्या अखत्यारीतील पाणीसाठ्यांचा स्त्रोत म्हणून वापर करावयाचा असल्यास, त्याकरिता जलसंपदा विभागाकडील पाणी आरक्षणाच्या मंजुरीची आवश्यकता राहणार नाही, असा निर्णय घेण्यात आला आहे. मंत्रिमंडळाच्या उक्त निर्णयास अनुसरुन आवश्यक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता, मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत समाविष्ट असलेल्यापैकी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फ़त अंमलबजावणी करावयाच्या नळ पाणीपुरवठा योजनांकरिता जलसंपदा विभागाच्या अखत्यारीतील पाणीसाठ्यांचा स्त्रोत म्हणून वापर करावयाचा असल्यास, त्याकरिता जलसंपदा विभागाकडील पाणी आरक्षणाच्या मंजुरीची आवश्यकता राहणार नाही.

२. सदर शासन निर्णय मंत्रिमंडळाच्या दिनांक १६ मे, २०१७ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयास अनुसरुन, तसेच जलसंपदा विभागाच्या अनौ. संदर्भ क्र.२१७/दि.२६.०७.२०१७ अन्वये मिळालेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९१५१७५०५३६२२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ram Apparao Sabane

Digitally signed by Ram Apparao Sabane
DN: CN = Ram Apparao Sabane, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Water Supply and Sanitation Department
Date: 2017.09.16 11:27:13 +05'30'

(रा. अ. साबणे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री/राज्यमंत्री (सर्व), मंत्रालय, मुंबई
४) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन, मुंबई
५) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
६) मा. विधानसभा/विधान परिषद सदस्य (सर्व), विधानभवन, मुंबई
७) मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई
८) अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
९) प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१०) सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
११) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई-२१,
१२) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पी.एम.टी.बिल्डींग स्वारगेट, पुणे.
१३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
१४) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र -१, मुंबई
१५) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर
१६) मुख्य /अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व).
१७) संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई
१८) उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी (सर्व), पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय,मुंबई
१९) निवड नस्ती (पापु-१९)